## ‘कॉल रेकॉर्डिंग घरच्यांना ऐकवेन...’ धमकी देत अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार, गर्भवती झाल्यानंतर गंभीर प्रकार उघड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वाशीम** – ओळखीच्या व्यक्तीकडे आपण विश्वासाने पाहतो. मात्र, याच ओळखीचा गैरफायदा घेत एका किराणा दुकानदाराने अल्पवयीन मुलीला धमकावून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार वाशीम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे उघडकीस आला आहे. मुलीच्या फोनवरील कॉल रेकॉर्डिंग तिच्या कुटुंबीयांना ऐकवण्याची धमकी देत संशयिताने तिच्यावर दबाव टाकल्याचा आरोप आहे. या अत्याचारातून पीडिता गर्भवती झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी कारंजा शहर पोलिसांनी ४५ वर्षीय किराणा दुकानदाराविरोधात पॉक्सो कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

कॉल रेकॉर्डिंगची धमकी देऊन दबाव टाकल्याचा आरोप या प्रकरणातील संशयिताचे नाव प्रफुल्ल साखरकर (४५) असे असून, कारंजा लाड शहरात त्याचे किराणा दुकान आहे. पीडित मुलीशी त्याची आधीपासून ओळख होती.

## दवबिंदूंच्या अभावामुळे पिकांच्या उत्पादनात घट होण्याची भीती

### कमी पाऊस, वाढती उष्णता आणि कोरड्या वातावरणाचा कपाशी, तूर व संत्रा पिकांना फटका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – यंदा मोर्शी तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यातच सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात वाढलेली उष्णता, कोरडे वातावरण आणि पहाटेच्या वेळी शेतात दवबिंदूंचा अभाव जाणवत असल्याने शेतकऱ्यांची चिंता



वाढली आहे. कपाशीचे बोंड भरणे, तुरीची फुलधारणा आणि संत्रा पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जमिनीतील ओलावा कमी झाल्याने कोरडवाहू पिकांना मोठा फटका बसत असून, वाढत्या तापमानामुळे पिकांमधील पाण्याचे प्रमाणही वेगाने कमी होत आहे. परिणामी कपाशीच्या बोंडांचे वजन घटणे, तुरीच्या शेंगांमधील दाणे व्यवस्थित न भरणे आणि संत्रा पिकांची वाढ खुंटणे अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनाही घटत्या पाणीपातळीमुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दवबिंदू हे पिकांसाठी काही प्रमाणात पृष्ठभागावरील ओलावा देत असले, तरी ते जमिनीतील पाण्याची जागा घेऊ शकत नाहीत. कमी पाऊस, जमिनीतील ओलाव्याची कमतरता आणि वाढती उष्णता या एकत्रित परिणामांमुळे यंदा पिकांच्या उत्पादनात आणखी घट होण्याची भीती असून, शेतकरी उर्वरित पिकांच्या उत्पादनाबाबत चिंतेत आहेत.

### जिजाऊ ब्रिगेड वरुड तर्फे आयोजीत

## गरबा स्पर्धेत नरखेडचा मशाल ग्रुप ठरला अव्वल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** –जिजाऊ ब्रिगेड वरुड तर्फे अष्टविनायक सभागृह येथे भव्य गरबा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या गरबा स्पर्धेला प्रमुख पाहुण्या म्हणुन सरला देशमुख, सुनंदा खोले आणि विनिता राजोरिया उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली. त्यानंतर अवनी यावलकर आणि दानिका यावलकर या मायलेकींच्या जोडीने सादर केलेल्या सुंदर नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली. गरबा स्पर्धेसाठी अमरावती येथील शर्वरी ठाकरे आणि सतीश ठाकरे






यांनी परीक्षक म्हणुन काम पाहिले. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मशाल ग्रुप नरखेड यांनी, द्वितीय क्रमांक वरुड गरबा क्वीन, तृतीय गरजा ग्रुप तर प्रोत्साहनपर पारितोषिक योगा ग्रुप वरुड यांना देण्यात आले.

कार्यक्रमातील ओपन गरबा स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये बेस्ट कॉस्च्युमचा पुरस्कार हेमाली चौधरी, बेस्ट एनर्जीचा पुरस्कार देवयानी देवघरे आणि बेस्ट गरबाचा पुरस्कार माही नागदिवे यांनी मिळविला. स्पर्धेतील विजेत्यांना विविध मान्यवर व प्रायोजकांच्या वतीने पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रज्ञा बोडखे व श्रावणी नाट्यशृंगार यांच्या वतीने, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक डॉ.कविता देशमुख यांच्या वतीने, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक डॉ.भूषण खोले यांच्या वतीने, प्रोत्साहनपर पारितोषिक सी.एस.झुंबा ग्रुपच्या प्रीती महात्मे यांच्या वतीने तर ओपन गरबासाठीचे पारितोषिक फेमस बॅग हाऊसच्या जयश्री खत्री यांच्या वतीने देण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन नंदिनी ठाकरे प्रज्ञा बोडखे, व योगिता नागमोते, प्रास्तविक डॉ.कविता देशमुख तर आभार अर्चना सोलव व मंजुश्री भड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## शरद देवघरे यांचे निधन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** - येथील प्रतिष्ठित नागरिक शरद गणपतराव देवघरे यांचे काल (ता.२५) सायंकाळी ६.३० वाजता वयाच्या ७१ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे पार्थिवावर आज दुपारच्या सुमारास निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पत्नी, २ मुली, जावई, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.



**वरुड** : शेंदुरजनाघाट येथील भाजपा नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष प्रशांत उर्फ पिंटू सावरकर यांना वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना जायंटस गृप ऑफ वरुडचे माजी अध्यक्ष नितीन खेरडे, हरिसेवा फाऊंडेशनचे उपाध्यक्ष उमेश कांडलकर, नगरसेवक हर्षल फुटाणे, बंडु काळे व इतर.

## गव्हाणकुंड येथे दुर्गामातेची विसर्जन मिरवणुक शांततेत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – गव्हाणकुंड येथे यंदा दुर्गामातेची विसर्जन मिरवणुक शांततेत, शिस्तबद्ध वातावरणात आणि निर्धारित वेळेत पार पडली. भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात निघालेल्या या मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत दुर्गामातेला भावपुर्ण निरोप दिला. यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत बॅन्जो सिस्टीमऐवजी महिला मंडळाच्या वतीने काढण्यात आलेली दिंडी विशेष



आकर्षण ठरली. पारंपरिक आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिंडीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

तरुण दुर्गा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली विसर्जन मिरवणूक उत्साहात पार पडली. मिरवणुकीदरम्यान शिस्त आणि शांतता राखण्यात आली. विसर्जन सोहळा शांततेत आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. भाविकांनी श्रद्धा, उत्साह आणि शिस्तीचे दर्शन घडवत दुर्गामातेला निरोप दिला.

### नवदुर्ग आदर्श नवयुवक दुर्गा मंडळ बारगांवच्या

## मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - बारगाव येथे नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक जाणीव जोपासत नवदुर्ग आदर्श नवयुवक दुर्गा मंडळ बारगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरास अनेक नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत गावातील सर्व रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिरात वात रोग,



मलेरिया, थायरॉईड, त्वचारोग, हृदयरोग अशा गंभीर व्याधींसह इतर सामान्य आजारांची तपासणी करण्यात आली. प्रत्येक रुग्णास योग्य निदानासोबत वैद्यकीय सल्ला, औषधोपचार मार्गदर्शन तसेच आरोग्य संवर्धनाविषयी माहिती देण्यात आली. या शिबिराचे तपासणी व मार्गदर्शन कार्य वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रितेश पाटील, सहाय्यक राजेंद्र शेळके, आरोग्य सहाय्यक धीरज फरकाडे, पोलीस स्टेशन बेनोडा ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात पार पडले. आदर्श नवयुग दुर्गा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक रुग्णाची काळजीपूर्वक डॉक्टरांकडून तपासणी करुन आवश्यक उपचार व जीवनशैलीत बदलांबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या तज्ञ परावर्षामुळे रुग्णांमध्ये समाधान व आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने मंडळाकडून महिलांसाठी विशेष सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य तपासणी सारखे सामाजिक उपक्रम राबवून मंडळाने आपल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव जपली आहे.

## भोरकपच्या अंबादेवीच्या घटाचे विधिवत विसर्जन : ट्रस्टच्या वादावर निर्णयाची प्रतीक्षा!

### महाराष्ट्र-मध्य प्रदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान : नवरात्रोत्सव प्रशासनाच्या देखरेखीखाली संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** - शहरापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरील सातपुड्याच्या पर्वतरांगांमध्ये वसलेल्या भोरकप येथील अंबादेवीचा नवरात्रोत्सव यंदा उत्साहात पार पडला. नवरात्रीच्या नवमीला पारंपरिक हिंदू धार्मिक रीतिरिवाजांनुसार घटाचे विधिवत विसर्जन करण्यात आले. अंबादेवीच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नाल्याजवळ, पर्वतातून वाहणाऱ्या झऱ्यांच्या सान्निध्यात हा





धार्मिक विधी पार पडला.

भोरकप येथील अंबादेवी हे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. अंबादेवी ही शिशुपाल राजाची कुलदैवत असल्याची श्रद्धा परिसरातील भाविकांमध्ये आहे. दोन्ही राज्यांतील भाविक अनेक वर्षांपासून एकत्रितपणे देवीची पूजा-अर्चना आणि सेवा करीत आले आहेत. मात्र, अलीकडच्या काळात मंदिराच्या ट्रस्टमधील व्यवस्थापनावरून वाद निर्माण झाल्याने या धार्मिक स्थळाच्या व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**ट्रस्टच्या वादामुळे प्रशासनाच्या देखरेखीखाली उत्सव**

मंदिराच्या व्यवस्थापनावरून ट्रस्टमधील संबंधित व्यक्तींमध्ये वाद आणि आरोप-प्रत्यारोप झाल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर ट्रस्ट बरखास्त करून मंदिराची व्यवस्था शासकीय देखरेखीखाली देण्यात आल्याचे सांगितले जाते. मध्य प्रदेशातील आठनेर येथील तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या व्यवस्थेच्या देखरेखीखाली यंदाचा नऊ दिवसांचा नवरात्रोत्सव पार पडला. मात्र, या वादामुळे मंदिराच्या भविष्यातील व्यवस्थापनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील भाविकांचे या देवस्थानाशी जुने नाते असल्याने व्यवस्थापनातील वादाचा परिणाम धार्मिक परंपरांवर होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**जुन्या समितीकडून घटविसर्जनाची परंपरा कायम**

प्रशासकीय देखरेखीखाली नवरात्रोत्सव पार पडत असतानाही, दरवर्षीप्रमाणे धार्मिक परंपरा जपण्याच्या उद्देशाने जुन्या समितीने घटस्थापना केली होती. नवरात्रीच्या नवमीला या घटाचे विधिपूर्वक विसर्जन करण्यात आले. त्यामुळे अंबादेवीशी संबंधित पारंपरिक धार्मिक विधी यंदाही पार पडला.

दरम्यान, अंबादेवी ट्रस्टच्या व्यवस्थापनाबाबत अंतिम निर्णयाची प्रतीक्षा कायम आहे. मंदिराची भावी व्यवस्थापन व्यवस्था कशी असेल, तसेच दोन्ही राज्यांतील भाविकांना पूर्वीप्रमाणे एकत्रितपणे देवीची सेवा करण्याची संधी मिळणार का, याकडे भाविकांचे लक्ष लागले आहे. ट्रस्टमधील वादावर लवकर तोडगा निघून या श्रद्धास्थानाची परंपरा आणि धार्मिक एकोपा कायम राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.